# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २२/०४/२०२४

➢ विनयभंग :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे फ्रेजरपुरा अप क्र ३९१/२४ कलम ३५४, ३४ भादंवि | अमरावती | दि २१.०४.२४ चे सकाळी ०७.०० वा दरम्यान<br><br>दा ता वेळ दि २१.०४.२४ चे ११.१३ वा. | एक महिला | १. सुंदरलाल चौक येथील कोको शॉपचे मालक नाव माहीती नाही<br>२. कोको शॉपमधील नोकर नाव माहीत नाही | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही कोको शॉप चे दुकानासमोरील पाण्याच्या नळावर एक पाण्याचा गुंड व दोन प्लास्टीक कॅन घेवुन पाणी भरण्यासाठी गेली असता कोको शॉप येथे दोन नोकर होते त्यापैकी एकाला शंभर रुपये देवुन पाणी भरुन मागितले .फि ने एक गुंड पाणी भरुन फलॅट मध्ये गेली व कॅन घेण्यास खाली आली असता कोको शॉपच्या नोकराच्या फोनवर कोको शॉप मालकाचा फोन आला व त्या नोकराने तो फोन फिर्यादीस दिला व कोको शॉप चा मालक फि ला म्हणाला की, तुमचे नाव काय आहे मला सांगा ,त्याला मी माझे नाव सांगितले त्याने फि ला म्हटले की,तुम्ही कोणाला विचारुन पाणी घेतले मी तुमच्या विरुध्द पोलीस स्टेशनला रिर्पोट देतो व अश्लिल भाषेत बोलुन फि ला लज्जा निर्माण होवुन फि चा विनयभंग केला अशा फिर्यादीचे रिर्पोटवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे फ्रेजरपुरा अप क्र ३९२/२४ कलम ३५४(क), ५०४,५०६ भादंवि | अमरावती | दि २१.०४.२४ चे सकाळी १४.०० वा दरम्यान<br><br>दा ता वेळ दि २१.०४.२४ चे १६.४६ वा. | एक महिला | सुरज सुनिल डवरे वय२१ वर्ष रा.मंहीद्र विद्यालयाचे समोर चपराशीपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की .यातील नमुद घटना ता वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे बांथरुम मध्ये आंघोळ करुन कपडे बदलवित असताना त्यांचे बाथरुमला एक छिद्र दिसले त्यामधुन कोणीतरी पाहत असल्याचे दिसले म्हणुन त्या छिद्रातुन फिर्यादीने पाहीले असता नमुद आरोपी हा त्या छिद्रामधुन पाहत असताना फिर्यादीस दिसला वरुन फिर्यादी त्यास विचारायला गेली असता आरोपी म्हणाला की मी बाथरुमला गेलो होतो व नमुद आरोपी हा फिर्यादीस शिवीगाळ करुन अंगावर जात होता व मारण्याची धमकी देत होता. फिर्यादीच्या अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ४००/२०२४ कलम ३७९ भादवी | रामपुरी कॅम्प गल्ली नं ४ अमरावती | दि २०.४२०२४ चे २०.३० वा ते २१.३० वा<br><br>दि २१.४.२०२४ चे २२.०२ वा | विजय हरीराम जाडोमल त्रीकोटी वय ७४ व्यवसाय इलेक्ट्रॉनीक रा . रामपुरी कॉम्प अमरावती गल्ली नं ४ साइ मंदीराजवळ अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की दि १८.४.२०२४ ला निरोप आला की माया नातुचे साक्षगंध तुटले म्हणुन १९.४.२०२४ रोजी दोन्ही र्पाटीने ऐकमेकांची साहीत्या परत केले दि २०.४.२०२४ रोजी शनीवारी सायंकाळी ०६.०० वा मी व माझ्ी पत्नी असे अमरावती ला येणे करीता निघालो तेव्हा माझ या नातुला आंगठी आणी सोन्याची चैन घ्यावयाचे होती ती सोन्याची चैन १६ ग्रॅम आणी अंगठी ३ ग्रॅम व नगदी १००० रू असे बॅग मध्ये सामान आणी वस्तु ठेवल्या होत्या ती बॅग घेवुन आम्ही दोघे अम डेपा ला सायस्कोर येथे रात्री ८.३० वा आलो आणी तेथुन रामपुरी कॅम्प येथे जाणारा ऑटो मध्ये बसलो त्यामध्ये दोन सवा-या सुध्दा होत्या आणी मी ऑटोमध्ये बसला तेव्हा माझ्याजवळ असलेली बॅग ऑटोच्या डीक्कीवर पाठीमागे ठेवली होती नंतर ऑटो चालक याणे खत्री बीछायत केद्र येथे ऑटो थांबला तेथुन आम्ही पती पत्नी दोघे ऑटोतील सामान बॅग घेवुन पायदळ घरी आलो आणी रात्री ०९.३० वा दरम्यान जेवण वैगरे केले त्यानंतर बॅगमधील सामान काढुन पाहले तर बॅगमध्ये १६ ग्रॅम ची चैन की अं ३०,००० रू आणी अंगठी ३ ग्रम की अं १५,००० रू आणी नगदी १००० रू असा एकुन ४६०००रू असा माल बॅगमध्ये दिसुन आला नाही सोन्याचे दागीने अं १० र्वषर्पुवी चैन बनवीली होती असा माल चोरी गेल्याचे दीसुन आल्याने पोस्टे ला येवुन रीर्पोट देत आहे |

विश्वासघात फसवणुक :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | नागपुरी गेट अप क्र. १४९/२४ कलम प्रतिलिपी अधिकारी अधि. ५१, ५२, ६३, ६८ | हयात नगर मुक्तीजिया मदरसाजवळ लालखडी अम. | दि. २०/४/२४ चे १३/४१ ते १८/२५ वा.<br><br>दि. २१/०४/२४ चे १८/१५ वा. | विजय उत्तमराव पवार वय ४४ धंदा - खाजगी नोकरी रा. जुनी रमाबाई सहकार नगर घाटकोपर पुर्व मुंबई | १)समीर बेग जमीर बेग वय २७ रा. लालखडी कलीम किराणा दुकानाजवळ अम. २) हुजेब खान रउफ खान वय २३ रा. हयात नगर पो.स्टे. ना. गेट अम. | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी हे नेत्रीका कॅंसल्टसी प्रायवेट लिमीटेट प्लॉंट न. २५ दुसरा माऴा शिव मंदीराजवऴ शालीमार मार्ग नवी दिल्ली येथे कार्यरत आहे. फिर्यादी यांना फोनव्दारे माहीती मिऴाली की नागपुरी गेट येथे बनावटी व्हील डिटर्जट पावडर आणी रीन साबन तसेत इतर नामांकित कंपनीचे डिटर्जंट पावडर वस्तु पकडले आहे.पो.स्टाफ.व पंचासह घटनास्थऴी जावुन खालील प्रमाणे माल जप्त केला आहे. १)पांढ-या रंगाचे प्लास्टीक २३ पोते ज्यामध्ये ८० ग्रॅंम वजनाचे सर्फ एक्सल डिटजंट पावडर पाकीट दिसुन आले. प्रत्येकी पोत्यात १२० पाकीटे असे एकुण २७६०पाकीटे आले. प्रत्येकी पाकीट कि. १०/- प्रमाणे एकुण २७६००/- रु. चा माल मिळुन आला.२) पांढ-या रंगाचे प्लॉंस्टीक १८ पोते ज्यामध्ये १ किलोग्रम वजनाचे व्हील ४५० पाकीटे दिसुन आले. प्रत्येकी पाकीट कि, ७९ रु. एकुंण ३२८५० रु. चा माल मिळुन आले.३) पांढ-या |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सहकलम १०३, १०४ ट्रेक मार्क कायदा सहकलम ४२०, ३४ भादवी | | | | | रंगाचे प्लॉंस्टीक २२ पोते ज्यामध्ये ५०० ग्राम वजनाचे व्हिल डिटजंट पावडर पाकीट दिसुन आले. प्रत्येक पोत्यात ३० पाकीटे असे एकुण ८४० पाकीटे दिसुन आले.प्रत्येक पाकीट ची कि. ३७ रु. प्रमाणे एकुण २४४२०/-रु. चा माल मिळुन आला.४)पांढ-या रंगाचे प्लॉंस्टीक १४ पोते ज्यामध्ये १२५ग्रम वजनाचे वहिल डिटजंट पावडर पाकीट दिसुन आले.प्रत्येक पोत्यात ६० पाकीटे असे एकुण ८४०पाकीटे दिसन आले. प्रत्येक पाकीट ची कि. १० रु. प्रमाणे एकुण ८४०० रु.चा माल मिळुन आले.५) खाकी रंगाचे पृष्ठाचे २८ बॉंक्स ज्यामध्ये ३० ग्रॅंम वजनाचे रिन साबुन दिसुन आले.प्रत्येक बॉंक्स मध्ये ८४ नग रिन साबुन असे एकुण २३५२ नग रिन साबन दिसुन आले. प्रत्येक रिन साबुन ची कि. १० रु. प्रमाणे एकुण २३,५२० रु, माल मिळुन आले तसेच सदर गोडावुन ची पोलीसांनी पंचासमक्ष पाहणी केली खालील प्रमाणे माल मिळुन आला. १) पांढ-या रंगाचे प्लास्टीक २६ पोते ज्यामध्ये १ किलोग्रॅंम वजनाचे व्हिल डिटजंट पावडर पाकीट दिसुन आले. प्रत्येकी पोत्यात २५ पाकीटे असे एकुण ६५० पाकीटे आले. प्रत्येकी पाकीट कि. ७९/- प्रमाणे एकुण ४७४५०/-रु. चा माल मिळुन आला.२) पांढ-या रंगाचे प्लास्टीक ४० पोते ज्यामध्ये १२५ ग्रॅंम वजनाचे व्हिल डिटजंट पावडर पाकीट दिसुन आले.प्रत्येकी पोत्यात ६० पाकीटे असे एकुण २४०० पाकीटे आले. प्रत्येकी पाकीट कि. १०/- प्रमाणे एकुण २४००/- रु. चा माल मिळुन आला. ३) ) पांढ-या रंगाचे प्लास्टीक ३ पोते ज्यामध्ये १ किलो ग्रॅंम वजनाचे घडी डिटजंट पावडर पाकीट दिसुन आले. प्रत्येकी पोत्यात २५ पाकीटे असे एकुण ७५ पाकीटे आले. प्रत्येकी पाकीट कि. ६९/- प्रमाणे एकुण ५१७५/- रु. चा माल मिळुन आला. ४) ) पांढ-या रंगाचे प्लास्टीक ४१ पोते ज्यामध्ये ५०० ग्रॅंम वजनाचे घडी डिटजंट पावडर पाकीट दिसुन आले. प्रत्येकी पोत्यात ४० पाकीटे असे एकुण १६४० पाकीटे आले. प्रत्येकी पाकीट कि. ३६/- प्रमाणे एकुण ५९०४०/- रु. चा माल मिळुन आला. ५) ) पांढ-या रंगाचे प्लास्टीक २० पोते ज्यामध्ये ११० ग्रॅंम वजनाचे घडी डिटजंट पावडर पाकीट दिसुन आले. प्रत्येकी पोत्यात १०२ पाकीटे असे एकुण २०४० पाकीटे आले. प्रत्येकी पाकीट कि. १०/- प्रमाणे एकुण २०४००/- रु. चा माल मिळुन आला. तसेच सदर गोडावुन समोर एक सिलव्हर रंगाची मारुती सुझुकी कंपनीची ओमनी क्. एम एच २९ आर ५२७५ ची पंचासमक्ष पाहणी केली असता सदर ओमनी मध्ये खालील प्रमाणे माल मिळुन आला. १) खाकी रंगाचे पृष्ठाचे १५ बॉंक्स ज्यामध्ये ३० ग्रॅंम वजनाचे रिन साबुन दिसुन आले. प्रत्येक बॉंक्स मध्ये ८४ नग रिन साबुन असे एकुण १२६० रु, चा माल मिळुन आला. असा पुर्ण एकुण २,८५,४५५/- रु. चा बनावटी माल मिळुन आला. तसेच सदर माल सेलकरण्याकरिता वाहतुक करण्याकरिता वापरात असलेले वाहन २) टाटा कंपनीचा ऐ.एस. ई क्. एम एच ४० बीजी ५६६१ कि. १.५०.०००/- रु. २) एक सिल्व्हर रंगची मारुती सुझुकी कंपनीची ओमनी क्र. एम एच २९ आर ५२७५ कि, १,००,०००/- रु.असा ताब्यात घेण्यात आला नमुद घटनास्थळावरुन समीर बेग जसिम बेग यांच्या ताब्यातुन २,८५,४५५/- रु. चा बनावटी माल३) एक सिलव्हर रंगाची मारुती सुझुकी कंपनीची ओमनी क्र. एम एच २९ आर ५२७५ कि. १,००,०००/-रु.असा एकुण ५,३५,४५५/-रु. चा माल पंचासमक्ष ताब्यात घेवुन पो.स्टे. आणले असे मला कळवुन जप्त माल दाखविले पंचासमक्ष आज दि. २१/०४/२४ रोजी दाखविले नमुद आरोपी विरुद्ध सदरचा गुन्हा दाखल |

ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे बडनेरा अप.क्र. २८६ /२०२४ कलम ४२९, ३४, भादवी कलम ५अ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अ. १९९५, कलम ११ प्राण्याना क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अ. १९६०प्रमाणे. | कोडेश्वर गोविंदपुर रस्तावर बडनेरा. | नमुद घ ता वेळ ठिकाणी दि.२१.०४.२०२४ चे ०३.३०वा. ते. ०५.३० वा.<br><br>दाखल ता वेळ- २१/०४/२०२४ चे २१.२६ वा. | पो. कॉ. निलेश उत्तमराव बावनथडे वय ३६ वर्ष रा. पो. स्टे बडनेरा अम. | वाहम चालक व एक अनोळखी इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी सरतर्फे पो. कॉ. निलेश उत्तमराव बावनथडे वय ३६ वर्ष रा. पो. स्टे बडनेरा अम. यांनी लेखी तक्रार अर्ज दिला की, त्याची सी.आर मोहाईल वाहनावर पो. कॉ. २१८ यांचे सह पेर्टोलीग ड्युटी असताना ११२ एम.डी.टी.वर CFS क्र.वर १९१२७१८ प्रमाणे तक्रार प्राप्त झाला माहिती मिळाली की कोडेश्वर गोविंदपुर रस्तावर भागात गाईची तस्करी करणारी एक गाडी अपघात ग्रस्त होवुन पलटी झालेली आगे. त्यातील गोवंश जनावरे जखमी झालेले आहेत. अशा माहितीवरुन घटनास्थळी गेलो असता XENON हे वाहन अपघात ग्रस्त होवुन रोडच्या बाजुला पलटी झालेले दिसले. त्याचे बाजुला तिन गोवंश अवस्थेत पडलेले दिसले. घटनास्थळी लोक जमा झालेले होते.कॉलर बाबत विचारपुस केली असता कॉलर निघुन गेला होता. उपस्थित असलेले इसम नामे ओमकार दातीर यांना विचारपुस केली. त्यानी सांगितले की सकाळी रनींग ला आलेल्यां मुलांनी मला कॉल करुन माहिती दिली की सकाळी ०३.३०. वा. ते.०५.३० दरम्यान एक जनावर भरलेले वाहन रस्ताचे बाजुला असलेल्या झाटावर आदळुन पलटी झाले व त्यातीस जवानरे गभीर जखमी झाले. फि. लगेच नमुद ठिकाणी सदर जनावरे वाहनाच्या ट्रालीमध्ये दोर खंडाचे साहाय्याने निर्धयतेने बांधले होते. लोकांचे मदतीने ते बाहेर काढले. अशा लेखी तक्रारीवरुन गुन्हा दाखल |
| ३ | सिटी कोतवाली अप १५७/२४ क ३८७,२९४, ४२७,३४ भादवि, | खत्री मार्कट वालकट कंम्पाउन्ट येथे रुषीराज प्रेंटीग अमरावती | २१/०४/२४ चे ०९/३० वा<br>२१/०४/२४ चे २०/५१ वा. | संतोष मानिकलाल शर्मा वय ५६ वर्ष व्यवसाय प्रिंन्टींग प्रेस रा. देसाई लेआउट न्यु गणेश कॉलनी अमरावती | १) मयुर किशोर सोळंके वय १९ वर्ष<br>२) सोमेश्वर विश्वकर्मा वय १९ वर्ष<br>३) रोहीत विश्वकर्मा २१ वर्ष तिन्ही रा. वालकट | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी यांचे खत्री मार्कट येथे रुषीराज प्रिंटीग प्रेस या नावाचे दुकान असुन बँनर प्रिंटींग चा व्यवसाय करतो. फिर्यादी हे नमुद घ.तावेळी व ठिकाणी रोजी सकाळी नेहमीप्रमाणे ०९.०० वा दुकान उघडले तेव्हा फिर्यादी यांचे दुकानात फोन करणारे कुंदन राजेश वानखडे ,गजानन खंडारे असे हजर होते सकाळी ०९/३० वा दरन्यान यातील चारही आरोपी हे फियादी यांचे दुकानासमोर चेंगड करीत बसले होते फिर्यादी यांनी आरोपीतांना म्हटले की, दुकानासमोर कशाला बसले आहे तेव्हा आरोपी क्र. १ याने म्हटले की, आमच्यामधे काही बोलायचे नाही आम्ही येथे काही करु तुम्हाला हे दुकान चालवायचे नाही का, तुम्ही जर आमचे मधे बोलले तर आम्ही तुमचा कांड करुन टाकु त्यानंतर आरोपी क्र. ३ याने तेथील दगड उचलुन अभी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | कंम्पाउंड<br>४) गौरव नागफआसे १८ वर्ष रा अमरावती | तेरा गेम करता हु, अशी धमकी देत दुकानाकडे आला फिर्यादी हे घाबरुन दुकानात गेले असता यातील सर्व आरोपी फिर्यादीचे मागे दुकानात आले त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपीस बाहेर जाण्यास सांगितले असता आरोपी क्र.१ याने त्याचे कमरेतुन चाकु काढुन अगर तुझे सीधे तरीके से दुकान चलानी है और यहापर धंदा करना है तो हमको १०,०००/-रुपये महिनेके देने पडेंगे अगर नही दिया तो तेरी दुकान के साथ तुढे भी जला डालेंगे अशी धमकी दिली. हे बघुन फिर्यादी व त्यांचे दुकानात काम करणारे कुंदन राजेश वानखडे,गजानन खंडारे हे खुप घाबरले थोड्या वेळानंतर शिवीगाळ करत त्यांनी दुकानासमोर ठेवलेल्या बॅंनर प्रिन्ट ची तोडफोड करुन निघुन गेले. फिर्यादी त्या घटनमुळे खुप घाबरले असल्यामुळे दुकान बंद करुन घरी निघुन गेले.यातील आरोपीतांनी संगणमतकरुन फिर्यादीचे दुकानात येवुन अश्लील शिवीगाळ करुन चाकु काढुन दुकान चालवायचे असेल १०,०००/- रुपये महिना द्यावे लागले नाहीतर तुला तुझे दुकानासह जाळुन टाकेन अशी जिने मारण्याची धमकी देवुन बणनरची तोडफोड केली. चारही आरोपीतांविरुध्द कायदेशिर कार्यवाही करीता फिर्यादी रिपोर्ट देत आहे अश फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा |

प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | खोलापुरी गेट | अप क्रंमाक 113/2024 कलम 65 (ई) मदाका | अमरावती | दि.-20/04/2024 चे 20/35 वा.ा.ता | दि. 21/04 /2024 चे 18/30 वा. ते 19.3-00वा दरम्यान दाखल | सरतर्फे पोहेकॉ मंगेश क्रुष्णराव भेलाये ब.न.202 पो.स्टे खोलापुरी गेट अमरावती शहर | एक महिला | हकीकत अश्या प्रकारे आहे की, यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व पो.स्टॉफ सह गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीवरुन नमुद महीला आरोपीवर प्रो रेड केला असता त्याच्या ताब्यातुन टॅंगोपंच देशी दारुचे पावट्या प्रत्येकी 180 एम.एल च्या 06नग सिलबंद कि.अं 420/- रु चा प्रो व्ही पंचासमक्ष माल जप्त केला,अश्या फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

अकस्मात मृत्यु :-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती मर्ग क्र. २९/२०२४ कलम १७४ जाफौ | यशनगरी केके कँमरेज शाळेसमोर मार्डी रोड अमरावती<br><br>२१/०४/२०२४ चे०५.०० वा.<br>दाखल ता वेळ २१/०४/२०२४ चे १७.३३ वा. | राजेश दशरथ मेश्राम वय५५ रा.यशनगरी केके कँमरेज शाळेसमोर मार्डी रोड अमरावती | एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी यांनी पोस्टेला येवुन जबानी रिपोर्ट दिला की त्यांचे वडील नामे राजेश दशरथ मेश्राम वय५५ रा.यशनगरी केके कँमरेज शाळेसमोर मार्डी रोड अमरावती याना टी बी व फुफ्फुसाचा आजार होता त्यांना दयासागर दवाखाना येथे दि.२३.०३.२०२४ रोजी सायकाळी भर्ती केले होते. ते दारुचे व्यसनी होते.दयासागर दवाखाना येथुन दि.२८/०३/२०२४ र ऐजी डॉ.पंजाबराव देशमुख दवाखाना येथे रेफर केले परंतु त्यांना दि.०१.०४.२०२४रोजी आम्ही भरती केले आज दि.२१/०४/२०२४ रोजी स काळी ०५.०० वा सुमारास फिर्यादीचे वडील राजेस दशरथ मेश्राम यांची तब्येत खुप खराब झाल्याने व इर्वीन दवाखाना येथे इलाजासाठी घेवुन गेले तेथे ईलाजादरम्यान मृत्यु पावले फिर्यादीचे वडील हे टीबी व फुफ्फुसाच्या आजाराने मरण पावले आहे फिर्यादीच्या अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल |
| २ | पोस्टे नांदगावपेठ मर्ग क्र १७/२४ कलम १७/२४ कलम १७४ जा.फौ. | नांदगापेठ ते कठोरा गांधी रोड डॉ.राठी यांचे शेताजवळ रोडचे खाली<br><br>घ.ता.वेळ दि २१/०४/२४ चे १७/०० वा दरम्यान<br><br>दा.ता.वेळ दि २१/०४/२४ चे २२/३० वा | अनोळखी इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे | सरतर्फे पोउपनी प्रदीप शहाणे पोस्टे नांदगावपेठ अमरावती शहर | थोडक्यात हकीगत अशा प्रकारे आहे की फि यांचे पोस्टे ला आज दि २१/०४/२४ चे ०९/०० वा ते दि २१/०० वा पावेतो डिओ ड्युटी असतांना मिळालेल्या माहीती वरुन कठोर गांधी रोड डॉ.राठी यांचे शेता जवळ गेले असता रोडचे बाजुला नालीत एक अनोळखी इसम पडलेला होता.वरुन त्यास अनोळखी इसमास लोकांचे मदतीने अँम्बुलस मध्ये टाकुन ईर्वीन दवाखान्यात गेले असता एम.ओ.साहेब यांनी त्यास मृत घोषीत केले सदर अनोळखी इसमाचे प्रेत तिन दिवस मृतकाचे नातेवाईक शोध घेणे कामी ईर्वीन दवाखाना येथील मच्युरी येथे ठेवण्यात आले असुन ईर्वीन मेमो क्र ०४२८ प्राप्त असुन सदर अनोळखी इसमाचे ईर्वीन मेमो वरुन ब्रॉडडेथ मेमो वरुन सदरचा मर्ग दाखल |
| ४ | पोस्टे राजापेठ मर्ग क्रं. ३३/२०२४ कलम १७४ जा.फौ. | घ.ता.वेळ - दि. २१/०४/२०२४ चे १९.१५ वा.<br><br>दा.ता. वेळ - दि. २१/०४/२०२४ चे २१.०७ वा. | अनोळखी इसम | संदिप दिपक इंगोले वय ३२ वर्ष धंदा -नोकरी पॉईसमेन रा. रेल्वे कॉलनी मुर्तिजापुर जि. अकोला | हकीगत अशा प्रकारे आहे की आम्ही सहापोउपनि निलेश ब.नं. ८८० सोबत पोका अमोल ब.नं. ४३६ पोस्टे राजापेठ ची दि. २१/०४/२०२४ रोजी १४.०० ते २१.०० वा. पावेतो तपास मदत डयुटी असतांना उपस्टेशन प्रबंधक अमरावती मध्य रेल्वे यांचे पत्रानुसार १९.१५ वा. लोको पायलट श्री. एस.एस. वाघमारे टेन क्रं. १२११२ अमरावती ते मुंबई यांनी माहिती दिली की रेल्वे क्रं. १२११२ ने कि.मी. ६६९/१० ते ६६९/१२ अमरावती बडनेरा रेल्वे लाईन दरम्यान रेल्वे ला एक अनोळखी इसम धडकला त्यामुळे घटनास्थळी जावुन घटनास्थळाची पाहणी केली असता अनोळखी इसम मरण पावला असल्याने सदरचा मर्ग दाखल |